म. ग्रं. सं. ठाणें
ाय जिलेंद्र
. क्र. ५५

REFBK-0000251

२५१

# समाजसुधारणा.

## श्रीमंत सरकार गायकवाड सयाजीराव महाराज यांनीं ता. ३० दिसेंबर १९०४ रोजीं मुंबई येथें भरलेल्या अठराव्या सामाजिक परिषदेपुढें इंग्रजींत भाषण केलें, त्याचें मराठी भाषांतर.

मिं० जस्टिस चंदावरकर यांनीं यंदाच्या सामाजिक परिषदेचे वेळीं प्रस्तावनारूप भाषण मीं करावें असें निमंत्रण केलें, तें मीं जरासें भीतभीतच स्वीकारिलें. या परिषदेचे अध्यक्षस्थानीं किती प्रख्यात पुरुष विराजमान झाले, आणि त्यांनीं किती कळकळीचीं आणि माहितीनें परिपूर्ण अशीं भाषणें करून आपलें कर्तव्य बजाविलें, हें माझ्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. आमच्या सामाजिक स्थितीविषयीं विविध प्रश्न हातीं घेऊन त्यांस त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि सुविचारांच्या प्रकाशानें उज्वल केलें. त्यांनीं प्रदर्शित केलेल्या विचारांत मी काय भर घालूं शकणार? आणि त्यांनीं बजाविलेली कामगिरी मजकडून बजाविली जाईल असा विश्वास तरी मला कसा येणार? तथापि ह्या सामाजिक परिषदेनें जें महत्कृत्य हातीं घेतलें आहे त्याला माझी पूर्ण सहानुभूति आहे, हें प्रसिद्धपणें सांगावें या हेतूनेंच विशेषतः मी मि० जस्टिस चंदावरकर यांचें निमंत्रण स्वीकारलें.

सामाजिक सुधारणा करण्यासाठीं चालू असलेल्या प्रयत्नांची प्रगति व त्यांस आलेलें यश याचें निरीक्षण करितां मला पुष्कळ विचार सुचले, ते मी आज सभेपुढें ठेवीत आहें. ते कांहीं नवे आणि अत्यंत महत्वाचे आहेत ह्मणून नव्हे, तर त्यांशीं आपल्या स्वतःचे विचार आपण तोलून पहावे या उद्देशानें मी ते आपणापुढें ठेवीत आहें. सामाजिक सुधारणेविषयींचे प्रश्न अत्यंत बिकट आहेत आणि त्यांजविषयीं कोणींही कसेही विचार लोकांपुढें ठेविले तरी त्यापासून उपयोग होईल. शिवाय, ते किती जरी बिकट असले तरी ते आपणांस सोडविलेच पाहिजेत. कारण आपण एक स्वतंत्र राष्ट्र ह्मणून जगांत राहणार कीं नाहीं, ही अत्यंत महत्वाची गोष्ट त्यावर अवलंबून आहे.

## राममोहनराय इत्यादिकांनीं सतीविरुद्ध चळवळ करून यश मिळविलें, त्यानंतर झालेले प्रयत्न.

सामाजिक सुधारणेची प्रगति सुरू झाल्यापासून आजपर्यंत ती किती झाली आहे याचें निरीक्षण करितां सकृद्दर्शनीं असमाधान वाटेल! राममोहनराय आणि त्यांचे जे इतर थोडे सुशिक्षित अनुयायी यांनीं सती जाण्याच्या आचाराविरुद्ध चळवळ केली, त्यास आज सत्तर वर्षें झालीं. त्या वेळीं सुधारक आणि दुर्धारक यांमध्यें सुरू असलेल्या झगड्याचा प्रथम जन्म झाला. त्यानंतर पुष्कळशी वादविवादाची घनघोर गर्जना झाली व थोडीशी प्रगति आणि पुष्कळ दिशांनीं पाऊल पुढें टाकण्याची इच्छा—हीं कार्यें घडून आलीं आहेत.

### धार्मिक चळवळी:—आर्यसमाज, ब्रह्मसमाज, थीऑसफी व वेदांत.

त्या वेळीं मोठमोठ्या धार्मिक चळवळी घडून आल्या आहेत. पैकीं ब्रह्मसमाज मोठ्या धिटाईनें हिंदुधर्मापासून अगदीं विभक्त होऊन नवीन विचारांची अशी एक समाजशाखा स्थापीत आहे. आर्यसमाज हा सामाजिक आणि धार्मिक सुधारणा करण्याविषयीं प्रयत्न करीत आहे, पण त्याचा उद्देश पूर्वीचें आहे, त्यावरच नवीन काळास युक्त अशी इमारत रचण्याचा आहे. थिऑसफी आणि वेदांत आंतल्या आंत समुद्रमंथन करून प्रगति करण्याविषयीं प्रयत्न करीत आहेत. ब्राह्मण उपाध्यायांचें साहाय्य न घेतां, लग्न, मुंज इत्यादि कर्में चालविण्यासाठीं रा. फुले यांनीं स्थापिलेल्या सत्यशोधकसमाजादि इतर लहानसहान चळवळींविषयीं फारसा उल्लेख करणें जरूर नाहीं.

### जुन्या मतांच्या लोकांनीं चालविलेल्या चळवळी:—परिषद्, सभा इत्यादि.

जुन्यास चिकटून राहणाऱ्या लोकांत देखील चळवळी सुरू आहेत. निरनिराळ्या जातींतील विवक्षित घातक प्रघात बंद करण्यासाठीं त्यांतील पुढारी प्रयत्न करीत आहेत. जैन आणि मुसलमान लोकांच्या परिषदा भरत आहेत; कायस्थ व इतर जातींच्या आणि पोटजातींच्या सभा इत्यादि स्थापण्यांत येत आहेत.

### सरकारी कायदे.

नवीन विचारांस असह्य असे प्रघात बंद पाडावे आणि आमच्या सुधारकांच्या होणाऱ्या छळांचें निवारण व्हावें, व त्यांच्या स्वाभाविक हक्काची पायमल्ली धर्मशास्त्रानुसारेंही होऊं नये, म्हणून सरकारांनीं उदार नीतितत्त्वांवर रचिलेले कायदे फार जपून निरनिराळ्या वेळीं केले आहेत.

## सामाजिक परिषद्.

ज्यांनीं सामाजिक प्रगति साधण्यासाठीं आपल्या बुद्धीचा उपयोग केला व अनेक तऱ्हेचे परिश्रमही केले, त्यांचेंच फळ ही अठरा वर्षांपूर्वी स्थापन झालेली राष्ट्रीय सामाजिक परिषद् होय. प्रत्येक वर्षी सामाजिक सुधारणा किती झाली, याचा हिशोब घ्यावा आणि निरनिराळ्या प्रश्नांविषयीं वादविवाद करावा व निरनिराळ्या ठिकाणीं चालू असलेल्या प्रयत्नांस कांहीं अंशानें तरी एकरूपता आणि एककेंद्रता आणावी असा हिचा उद्देश आहे.

## सामाजिक सुधारणेची प्रगति.

आपल्या पुढें प्रश्न आहेत ते हे कीं, गेल्या सत्तर ऐंशी वर्षांमध्यें या प्रयत्नांस किती यश आलें आणि जी प्रगति झाली आहे ती आपल्या प्रयत्नांमुळें कितपत झाली आहे. पहिल्या प्रश्नास आपण असें उत्तर देऊं शकूं कीं विद्येंत आमचें पाऊल हळूहळू पुढें पडत आहे, त्यामुळें आमच्या मनास अधिकाधिक संस्कृतता येत चालली आहे, व त्यामुळें देशांत सामाजिक सुधारणेच्या आवश्यकते-विषयीं खात्री अधिकाधिक प्रसृत होत आहे. उदाहरणार्थ, पूर्वीपेक्षां लग्नें अधिक परिपक्व वयांत होऊं लागलीं आहेत; अशी सुधारणा झाल्याचें आपणांस दाखवितां येईल. हें खरें कीं वैद्यशास्त्राप्रमाणें आणि आमच्या पूर्वजांच्या अधिक शहाणपणाच्या प्रघातांस अनुसरून आम्हीं, मुलें आणि मुली जितक्या परिपक्व वयाचीं झाल्यावर लग्न करावें तितकें अद्याप करूं लागलों नाहीं. त्याचप्रमाणें, हेंही दाखवितां येईल कीं जेवण्यासंबंधीं आणि बाहेर गांवीं प्रवास करण्यासंबंधीं असलेले ज्ञातिनिर्बंध शिथील होत आहेत आणि विधवाविवाहाच्या आड येणाऱ्या पुष्कळ अडचणींचें निवारण आमच्या सूज्ञ सरकारांनीं केलें आहे.

आणि असेंहि वाटण्याचा संभव आहे कीं, या सर्व सुधारणा होऊन आमच्यांत बरीच प्रगति झाली आहे; व आमचें पाऊल पुढें पडत आहे याबद्दलचा यांत पुरावा पुष्कळ आहे.

## झालेली सुधारणा नैसर्गिक प्रवृत्तीमुळें झाली ... प्रयत्नांमुळें नाहीं.

असे परिणाम झाल्याचीं उदाहरणें का...
लागल्यास आम्हांस असें कबूल करावें लागे...
मानण्यास फारसें कारण नाहीं; आणि आपण

केलें आहे थोडें, असेंच आपणास कबूल करावें लागेल. शिवाय आपणास असेंही दिसून येईल कीं, वस्तुस्थितींत फरक पडल्यामुळें केवळ निरुपाय ह्मणून या गोष्टी घडून आल्या आहेत. आह्मी त्यांत स्वतः समजून उमजून केलेल्या प्रयत्नांचा भाग फार थोडा आहे.

मुलामुलींच्या लग्नाचें वय वाढण्याचीं मुख्य कारणें हीं आहेत कीं, एक तर आपल्या मुलांस शिक्षण देण्यासाठीं त्यांचें लग्न लवकर करितां येत नाहीं; शिवाय प्रत्येक जातींत वरांत व वधूंत अवश्य हवेत असें मानल्या जाणाऱ्या गुणांची कल्पना अधिकाधिक उदात्त होत आहे; आणि त्यामुळें मुलींसाठीं वर मिळणें अधिकाधिक कठीण होत आहेत. त्याचप्रमाणें, रेल्वे, शाळा, कॉलेजें इ० ठिकाणीं, त्याचप्रमाणें सरकारी नौकरीमुळें सर्व जातींचे लोक एकमेकांसन्निध येतात, त्यामुळें जातिनिर्बंध शिथिल होत आहेत. देशाच्या औद्योगिक आणि सांपत्तिक स्थितीचें स्वरूपच असें आहे कीं, त्यामुळें निरुपाय होऊन परदेशगमन हें अवश्य झालें आहे व तें अधिक अधिक पसरत चाललें आहे.

अशा तऱ्हेच्या जबरदस्त परिस्थितीमुळें आमच्या विविध जातिनिर्बंधांस शिथिलता आली आहे. ती कांहीं आमच्या परिश्रमाचें फळ होय असें ह्मणतां येत नाहीं.

## आह्मी निराश न होतां अधिक खटपट केली पाहिजे.

परंतु आमची सुधारणेची प्रगति थोडी झाली आहे, ह्मणून व्यर्थ निराश होऊन बसण्यांत अर्थ नाहीं. सामाजिक सुधारणा ह्मणजे काय हें पुरें समजून घेण्याविषयीं जर आपण खटपट केली, आमच्या जुन्या रीतिभातींत काय गोमी आहेत हें पूर्णपणें ओळखलें, यापुढें आपल्या कृति अधिक समंजसपणाच्या आणि आपल्या स्वतःवर अधिक भरंवसा ठेवून केल्या, आणि होणारी सुधारणा आपल्या स्वतःच्या खटपटींचें आणि परिश्रमाचें फल होईल असें करण्याविषयीं प्रयत्न केला, तर तें अधिक श्रेयस्कर होईल.

## पूर्वस्थितीस अनुसरून सुधारणा.

पण प्रथमतः सुधारणा व्हावयाची ती कायम रहावयाची असेल तर राष्ट्रीय तत्त्वांवर तिचा पाया रचला पाहिजे, ह्मणजे ती देशाच्या पूर्व परि-

श्री ग्रंथ संग्रहालय

स्थितीस अनुसरून असली पाहिजे, असें प्रतिपादन करणारी विचाराची एक नवीन शाखा उद्भवली आहे, तिजविषयीं चार शब्द बोलले पाहिजेत.

## 'राष्ट्रीय तत्त्वांवर प्रगति' याचे केलेले विविध अर्थ.

या शाखेसंबंधीं मोठी अडचण ही आहे कीं, राष्ट्रीय सुधारणा ह्मणजे काय, याची व्याख्या निरनिराळे लोक निरनिराळी करितात. इरास्मस यानें हळूहळू सुधारणा केली, तशाच रीतीनें सावधपणें आपणही करावी असा त्याचा कित्येक अर्थ करितात. कित्येक, आर्यसमाजाप्रमाणें अगदीं जुन्या काळची व्यवस्था स्थापित करावी असें प्रतिपादितात आणि कित्येक ह्मणतात कीं, पूर्वीच्या युगांतील दोष काढून टाकून त्या वेळचा सत्वगुण ऊर्जित करावा. आपणांस असेंहि कबूल केलें पाहिजे कीं, राष्ट्रीय तत्वांवर सुधारणा करावी असें जे कित्येक ह्मणतात तें फक्त सुधारणेस व्यत्यय आणावा आणि पुढें पडलेलें पाऊल मागें यावें अशा हेतूनेंच ह्मणतात.

## या प्रतिपादनांतील थोडासा ग्राह्यांश.

देशाच्या परिस्थितीस अनुसरून व लोकांच्या गुणावगुणानुरूप अशीच सुधारणा झाली पाहिजे.या विधानांत, थोडासा ग्राह्यांश आहे यांत कांहीं शंका नाहीं.

आमच्या परिस्थितींत निःसंशय अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, त्यामुळें कोणतीही नवी कल्पना अगदीं अक्षरशः अमलांत आणणें कठीण आहे. परकीयांचा अम्मल शतकेंच्या शतकें चालला असतांही आमच्यांत पूर्वापार चालत आलेले कांहीं गुणावगुण अद्याप तसेच राहिले आहेत. याचें कारण तरी हेंच. बंद्या गुलामाप्रमाणें परकीयांचें अनुकरण करणें यांत खरी सुधारणा नसून, पुष्कळदां त्यापासून पूर्वींचा वाईट प्रघात बंद होण्याऐवजीं दुसरेच अपायकारक परिणाम घडून येतात हेंही खरें आहे.

## राष्ट्रीय प्रगति हा आमचा मुख्य हेतु होय.

राष्ट्रीय तत्वावर सुधारणा करावी असें जें ह्मणतात, यामध्यें हें एक मोठें महत्वाचें तत्व अंतर्भूत आहे कीं, सुधारणेचा मुख्य हेतु ह्मणजे सर्व राष्ट्राची सुधारणा करणें हा होय, आणि देशाची खरी सुधारणा ह्मणजे सर्व प्रजाजनांस जी पुढें नेईल ती होय.

## सत्याचा प्रकाश कोणीकडून कां होईना!

सत्याचा प्रकाश कोणीकडून आला तरी हरकत नाहीं. जर कोणच्याही विवक्षित सुधारणेचे योगानें सर्व देशाची प्रगति होऊन हित होईल,

तर ती सुधारणा राष्ट्रीय तत्त्वांवर झाली असें ह्मटलें पाहिजे. मग आपल्यापुढें तिचें घेतलेलें स्वरूप अर्वाचीन असो वा वैदिक काळांतील असो, युरोपांतील असो किंवा हिंदुस्थानांतील असो, आमच्या रीतीभातींस आणि प्रचारांस मान्य असो किंवा नसो, पण सत्य ह्मणून जें आपणास दिसतें तें आपण प्रचारांत आणलें पाहिजे. हिंदुस्थानची गतास्थिति पुनः सजीव करणें हें आपलें काम नव्हे, तर देशास भविष्य काळीं सुखसमाधान आणणें हें होय.

## पूर्वींच्या धर्मशास्त्राची संमति असो वा नसो, आपण आपल्या बुद्धीवर भरंवसा ठेविला पाहिजे.

येवढ्याचसाठीं आपणास एका बाबतीबद्दल खबरदारी घेतली पाहिजे. पूर्वींच्या धर्मशास्त्रास काय अनुसरून आहे, हें पाहून आमची सुधारणा व्हावयाची नाहीं. पूर्वींच्या मनूंत जें पवित्र मानिलें गेलें तें पुष्कळदां उदात्त असलें, पण त्याहून अधिक वेळां त्याचा खरा अर्थ लोकांस कळत नाहीं. ह्मणून, सांप्रतकाळीं कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत हें ठरवितांना धर्मशास्त्राकडे विशेष लक्ष न देतां जर आपण पूर्वानुभव आणि नवीन ज्ञान यांचें साहाय्य घेऊन सांप्रतकाळीं कशांत आपलें हित आहे हें सारासार विचार करून ठरविलें, तरच फायदा होणार आहे.

सारासार विचार, व्यवहारदक्षता आणि बोलण्याप्रमाणें कृति, या गोष्टी आपणांस अवश्य आहेत. पूर्व युगाविषयींच्या समजुतींस किंवा पुराण धर्मशास्त्रांच्या ग्रंथास अमुक एक गोष्ट मान्य आहे किंवा नाहीं याबद्दल वादविवाद करण्यांत अर्थ नाहीं.

## आमची सामाजिक स्थिति सर्वांशीं दूषणार्ह नाहीं आणि पुष्कळदां तिला व्यर्थ दोष दिला जातो.

पुष्कळदां असा प्रश्न विचारला जातो कीं, सामाजिक सुधारणा हवी कशास? आमची सामाजिक स्थिति दूषणार्ह आहे, असें ह्मणतां येणार नाहीं. व प्रत्येक समाजस्थितींत गुणावगुण असणारच आणि जर आमच्या समाजस्थितींतले दोष डोळ्यांत तेल घालून पहावयाचे तर गुण कां पाहूं नयेत? उगीचच्या उगीच दोष फुगवून सांगण्यांत अर्थ नाहीं. त्यापैकीं पुष्कळ स्थानिक आहेत. उदाहरणार्थ बंगाल्यांतील कुलीन नांवाच्या जातींत प्रसृत असलेली अनेक बायका करण्याची रीत किंवा गोषाची रीत. युरोपियन

लोकांनीं केलेल्या टीकेकडे फार लक्ष देणें हें देखील पुष्कळदां रास्त होणार नाहीं. कारण कीं त्यांस पुष्कळदां वस्तुस्थिति समजत नाहीं. आणि, आपल्याहून भिन्न असलेल्या राष्ट्रीय रीतीभातींविषयीं त्यांस असावा तितका आदर नाहीं. उदाहरणार्थ ते पुष्कळदां असें समजतात कीं, तिकडील रीतीप्रमाणें आमच्यांत लहानपणीं लग्न होतें ह्मणून लग्न झाल्याबरोबर वधूवरांत पतिपत्निव्यवहार सुरू होतो. गोषाची पद्धत सर्वव्यापी आहे असें ते समजतात. दुसऱ्या एका गोष्टीविषयीं सावधानता बाळगली पाहिजे. ती ही कीं, केवळ बदलाबदल करणें ह्मणजे सुधारणा नव्हे. उदाहरणार्थ, वारांगनांच्या नृत्यगायनाविरुद्ध होत असलेली चळवळ.—अशा रीतीनें लोकांस जबरीनें साधुसंत करण्याच्या प्रयत्नाचा परिणाम इतकाच होईल कीं, त्याचेयोगें विशेष उपद्रवी नाहीं, असें एक करमणुकीचें साधन नाहींसें होईल. आधींच आमच्यांत करमणुकीचीं साधनें फार थोडीं आहेत; आणि तीं बंद करण्यापासून कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. अर्थातच प्रत्येक समंजस मनुष्य जीं करमणुकीचीं साधनें दूषणार्ह आहेत, तीं सुधारण्याचा प्रयत्न करतीलच.

## सामाजिक परिषदेच्या हेतूंचें वर्गीकरण.

आतां प्रश्न हा कीं, सामाजिक परिषदेचे हेतु कोणकोणते आहेत व आपल्यास कोणत्या दिशेनें सुधारणा करावयास पाहिजे? त्या बाबी येणेंप्रमाणें:—

१ स्त्रीशिक्षण.
२ बालविवाह-निषेध.
३ विधवा-पुनर्विवाह.
४ अनेकपत्नित्वाचा निषेध.
५ जातिनिर्बंधाची शिथिलता.
६ पोटजातींत बेटीव्यवहार.
७ सर्व जातींची एकच पंगत.
८ परदेशगमन व नौकागमनाविषयीं सवलत.
९ नीच ह्मणून मानलेल्या जातींचा उद्धार.
१० मद्यपान निषेध.
११ देवस्थानादि परोपकारी संस्थांची सुव्यवस्था.

या यादींचें जर आपण परीक्षण केलें तर मला वाटतें कीं, या बाबींचे दोन मुख्य भाग करतां येतील, एक तर जातिभेदापासून उद्भवणाऱ्या अडचणी, (२) स्त्रीवर्गाच्या स्थितीविषयीं आणि अधिकाराविषयीं येणाऱ्या अडचणी, हे मुख्य दोन प्रश्न आपल्यापुढें आहेत. हे आपण सोडविले तर वरील यादींत सांगितलेल्या सुधारणा सहज घडून येतील.

## सुधारणेचीं साधनें व रीति–कायदा.

हे प्रश्न सोडविण्याचे कोणते कोणते मार्ग आहेत? दोन मुख्य मार्ग आपल्यापुढें दिसतात; एक सरकारी कायदा व दुसरा–लोकाचें मन वळविणें. यांपैकीं सोपा आणि लवकर अमलांत आणण्याजोगा मार्ग कायदा हा आहे. पण यांत कमीपणा हा आहे कीं, कायद्याला विशेष बाबतींतच हात घालतां येतो, आणि त्याचा परिणाम तितका चिरस्थायी किंवा खोलवर होत नाहीं. पण कांहीं अंशीं आमच्या लोकांच्या जातिस्वभावास कायद्याचाच उपाय जास्त अनुरूप वाटतो. आमच्या लोकांचा जातिस्वभाव, ब्रिटिश राष्ट्राखेरीज इतर जर्मन, फ्रेंच इ० युरोपखंडांतील राष्ट्रांतील लोकांच्या स्वभावासारखा आहे. आह्मांला आपण होऊन कोणत्याही कामीं प्रारंभ करावयाला नको. सरकारनेंच प्रारंभ करावा हें बरें असें आह्मांस वाटतें. पण आपल्या स्वभावाची हीही पण खोड आहे कीं, आह्मी कांहीं न केलें तरी पण सरकारनें कांहीं केलें तर त्यावर टीका करण्याला मागें घेऊं, ही गोष्ट मनांत आणूं नका. तरी पण ब्रिटिश सरकारची परकी सरकार ह्मणून नाजूक स्थिति असतांही व सरकाराला आपल्या धोरणाला सावधगिरीचा आळा घालणें जरूर पडतें असें असूनही, त्यांनीं आमच्या लोकांतल्या क्रूर चाली मोडण्याच्या उद्योगांत जी आजपर्यंत सिद्धि मिळविली आहे, ती मनांत आणून आपण त्यांचे आभार मानिले पाहिजेत. या उद्योगांत आणखीही पुढें जातां येईल असें त्यांस वाटतें तर बरें होतें, असाही विचार आमच्या मनांत येतो.

## नेटिव्ह संस्थानें.

नेटिव्ह संस्थानांच्या सरकारची शक्ति पुष्कळ अंशीं नियमित व त्याचा शक्ती प्रदेशही संकुचित आहे. अशी वस्तुस्थिति आहे तरी त्यांच्या हातून एक मोठी उपयुक्त कामगिरी होण्याजोगी आहे. ती ही कीं, राष्ट्राच्या प्रगति-

रूप शक्तींना, तें तें सरकार केंद्रभूत होऊन, तेथून त्या शक्तींना स्फुरण आणि वळण मिळण्याजोगें आहे. ही कामगिरी त्यांजकडून न झाली तरी सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नांत नेटिव्ह संस्थानच्या सरकारानें निदान ब्रिटिश सरकारच्या मागें रहातां कामा नये. जे नेटिव्ह संस्थानचें सरकार आपापले राज्यांतील लोकांत सुधारणेची इच्छा प्रचलित करून पूर्ण दशेला आणून सोडील, तें एकंदर राष्ट्राची सुधारणा करण्यास मोठेंच साहाय्य देईल यांत संशय नाहीं. येणेंकरून प्रसंगोपात ज्या आमच्या वडील संस्थानिकांनीं स्वतःच्या आचरणाचें, प्रगतीच्या शक्तींना वृद्धि देणारें असें उदाहरण घालून दिलें आहे व जें पाहून तरुण संस्थानिकांचेंही आचरण दिवसानुदिवस सुधारत जाईल, त्याबद्दल त्यांना मी कृतज्ञतेची पुष्पांजली वाहिली तर वावगें होणार नाहीं. हे संस्थानिक मधून मधून एकत्र जमून समाजहिताच्या सामाजिक प्रश्नांविषयीं आपापले विचार परस्परांस कळविण्याची संधि आणितील तर किती तरी चांगलें होईल बरें?

## मन वळवणें.

पण आपण लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ज्या संस्थानचीं पाळें मुळें समाजांत खोल गेलीं आहेत, त्या संस्थानच्या बाबतींत कायद्याचें कांहीं चालणार नाहीं. येथें शिक्षण हा एकच उपाय आहे. ह्मणजे विद्वानांनीं, शहाण्यांनीं साऱ्या लोकांची समजूत घातली पाहिजे. सारे लोक जागृत होतील, सारे लोक मनापासून विचार करण्याला व विचारानुरूप वागण्याला तयार होतील, असा उपदेश पाहिजे आहे. अशी विचारजागृति एकदां झाली ह्मणजे ज्या एक एक सामाजिक प्रश्नांचा आपण निरनिराळा विचार करीत आहों, त्या प्रश्नांचा उलगडा आपोआप होईल. परंतु ही जागृति खरोखरच सार्वत्रिक खऱ्या भक्तीनें झाली पाहिजे ती घडून येण्याचा संभव नाहीं. तो काळ दूर आहे, ह्मणून जी सुधारणा आज अमलांत आणण्याजोगी आहे, व जीकरितांच आपणाला कांहीं खटपट करितां येईल, ती लहान आहे, तिजबद्दलचे प्रयत्नही अल्प आहेत, ह्मणून आपण त्यांचा धिक्कार करितां कामा नये.

## जात.

### दोन प्रश्नांचे वाईट परिणाम कोणते हें पहाण्याकरितां त्यांचा विचार.

आपण जात आणि स्त्रियांची स्थिति या दोन प्रश्नांचें थोड्या विस्तारानें अवलोकन करूं या. हें करितांना त्यांचें विद्यमान स्वरूप कोणतें आहे,

त्यांच्यापासून समाजावर वाईट परिणाम कोणते घडतात, आणि त्यांत विगूढ अशीं कोणतीं तत्त्वें आहेत, हें पाहूं या.

## जातीपासून होणारे वाईट परिणाम व्यक्तीवर.

जातीपासून होणारे वाईट परिणाम सर्व राष्ट्रावर होत आहेत. त्यांतील एका अवयवावर होतात असें नाहीं. असंख्यात अल्प अल्प विधींनीं व अर्थशून्य नियमांनीं एकएका व्यक्तीचें जीवित जखडून टाकिलें आहे. कुटुंबसंबंधांत, विवाहांत, मुलांच्या शिक्षणांत आणि विशेषतः वर्तनांत व्यक्तींवर निर्बंध आहेच. प्रत्येक मनुष्याची सांपत्तिक स्थिति जातीमुळेंच सुधारत नाहीं. त्याला जातीचा फांदा सोडून दुसऱ्या फांद्यांत शिरतां येत नाहीं, पाश्चात्य राष्ट्रांतील विद्या शिकतां येत नाहींत, व आपल्या विद्येची व आपली स्वतःची थोरवी आहे तिजहून जास्त वाटून त्यास आपल्या सुधारणा करितां येत नाहीं.एखाद्या धंद्यांत अथवा उद्योगांत तो शिरला तर तेथून ही जात त्याला नाडतेच. कधीं अविश्वास, कपट, मत्सर, यांस ती वाढविते; परस्परांच्या गुणांचें परस्परांस पूर्ण साहाय्य घेऊं देत नाहीं. जात परस्पर संगतिसुखाचाही संसार करिते. कारण ती एका जातीच्या पुरुषास त्याच त्या जातींत कोंबून ठेवून दुसऱ्या जातींच्या व्यक्तीशीं समागम करूं देत नाहीं, व त्या सहवासापासून होणारी मानसिक सुधारणा होऊं देत नाहीं. मग त्या जातीची उन्नति कशी होणार ?

## नागरिकवृत्ति.

व्यक्तिवृत्तीच्या पलीकडे आपण जाऊं. त्या नागरिकवृत्तींत, स्थानिक वृत्तींत, जात त्या त्या नगराविषयींच्या अथवा प्रांताविषयींच्या अभिमानाची आशा खणून काढिते; सार्वजनिक हित मागें सारून व एकएका जातीचें हित पुढें करून, सार्वजनिक हित साधण्याकरितां संहत प्रयत्न जरूर आहेत, ते होऊं देण्याला अडचण आणिते ! परंतु जातीचे सर्वांत मोठे भयंकर परिणाम घडतात ते राष्ट्रीय वृत्तीवर व राष्ट्रीय एकीवर, जात स्थानिक द्वेष वाढविते, जातींजातींच्या हितांत विरोध माजविते, व जें एक राष्ट्रीय वृत्तिरूप समान हितरूप कल्पनेचें उदात्त एक चित्र सर्व जातींच्या सर्व लोकांच्या डोळ्यांपुढें स्पष्ट रेखलेलें असावें तेंही जात अस्पष्ट करि... लोकांलोकांत बिघाड आणून राष्ट्राचीं व्यंगें तीं दुरुस्त करूं देत नाहीं, व पाश्चात्य

सुधारणेच्या सहवासाचीं फळेंहीं लाभूं देत नाहीं, इतकेंच नाहीं, तर केवळ जन्मरूप उपाधीनें जे आपणाहून विभिन्न आहेत, ते आपले बंधु आपणांहून सर्वांशीं नीच आहेत असें ठरवून, जात, आपला मानवधर्म, आपली सदयता हीं आपणापासून हिरावून ज्या उन्नत व उदार मनोवृत्तींनीं युरोपांतील समाजांतील राष्ट्रें इतकीं सुधारलीं व परस्परांस सहायभूत झालीं, त्या उदार मनोवृत्तींचा उदय, जात आपल्या मनांत होऊंच देत नाहीं.

## समाजांतील निरनिराळ्या अवयवांचा उपयोग होऊं देत नाहीं.

आपल्या समाजांतील बहुविध वर्गांतील लोकांच्या बहुविध मानसिक शक्तींचा जितका लाभ करून घेतां येईल तितका लाभ ती आपणाला होऊं देत नाहीं. जात आपल्या मनोवृत्तींची व आपल्या बुद्धीची वाढ खुंटविते. आपल्या समाजांत आपणांस पूर्वकालाशीं अगदीं जखडून टाकणारी आपली जात होय. सर्व सुधारणांची वैरिणी! जो कोणी सुधारक राष्ट्राची प्रगति करण्याकरितां ह्मणून झटला, त्याला जातीनें बहिष्कृत केलेंच! तिचीं बंधनें विवेकशून्य विधिवितानांचा आधार! स्वतः गतकालाला बिलगून राहिलेली ती! देशकालवर्तमानस्थितिपरत्वें जे आचारविचारांत फेरफार आपणांस गतिक झाले आहेत, ते ती थोडेच सुकर करणार?

## जातीचा इतिहास.

इतिहासाच्या दृष्टीनें जात पूर्वकालीं कशी होती हें आपण पाहूं गेलों तर आपणास एक ठळक गोष्ट दिसते. ती ही कीं, जातीचें कोणतेंही पूर्वकालीन स्वरूप घ्या, तें तिच्या हल्लींच्या स्वरूपाइतकें अलौकिक, इतकें तर्कशून्य गुंताडें (mixture) झालें नव्हतें. पूर्वकालीं समाज एक होता. जिवंत-जोमदार होता; तेव्हां समाजाच्या विविध जिवंतपणाच्या हालचालींत जातीमुळें कोणताही प्रत्यवाय येत नसे. त्या वेळीं जातिरूप व्यवस्था ही गुणधर्मांच्या विभागाच्या तत्वावर उभारलेली स्वाभाविक व व्यवहारास योग्य अशीच संस्था होती.

## वैदिक काळ.

वैदिक काळांत जात बहुतेक नव्हतीच असें ह्मटलें तरी चालेल. त्या वेळीं समाज एकविध असल्याकारणानें गुणधर्मविभागाची आवश्यकता नव्हती. त्या वेळची राष्ट्रीय वृत्ति एक व जोमदार होती. या कालापासून अलीकडे

आलें ह्मणजे हळूहळू जातीची वाढ दिसूं लागते आणि दुर्दैवेंकरून पुढें तिचा नष्टकालही दिसतो.

## ऐतिहासिक काळ.

ऐतिहासिक काळांत जात ही समाजाच्या निरनिराळ्या अंगांचे विभाग दर्शवित असे. हे विभाग साधे व्यवहारास धरून होते, ह्मणजे राष्ट्रामध्यें साधारणपणें जे चार वर्ग असतात व वर्गानुसार कर्तव्यें असतात त्या वर्गांतीं कर्तव्यें जातिव्यवस्थेनें विभागून दिलीं होतीं. जातीजातींत व्यवहार होतच नसे, असें दिसत नाहीं. दरएक जातीच्या गुणकर्मांनीं इतर जातींच्या गुणकर्मांची पूर्ति व्हावी अशी व्यवस्था उत्तम प्रकारें त्या वेळीं केली होती. अनुलोम विवाह आणि प्रतिलोम विवाह, ह्मणजे खालच्या वर्णाच्या व वरच्या वर्णाच्या कन्यांशीं पुरुषांचे विवाह होत नव्हते असें नाहीं.

## पहिला ऱ्हासाचा काळ.

यानंतर पुढच्या काळांत बुद्धीचीं उत्तम फळें आविर्भूत झालीं खरीं, पण त्याच काळांत ऱ्हासाचीं पहिलीं चिन्हेंही दिसूं लागलीं. या काळांत जातीचीं बंधनें जास्त दृढ झालीं. जातींजातींत युद्धें सुरू झालीं. क्षत्रिय आपल्या क्षात्रतेजापासून भ्रष्ट होऊन सत्तेस मुकला. ब्राह्मणाचें तेज कमी होत चाललें. हे वाईट परिणाम एकदम जरी दिसून आले नाहींत तरी, समाजांतील विविध शक्तींची समतोलता नाहींशी झाली. जातीचा लवचिकपणा अगदीं गेला. जातीजातींत पोटजाति उत्पन्न झाल्या, आणि मग असा एक काळ आला कीं, ज्यांमध्यें चोहोंकडे सर्व अव्यवस्थाच माजली.

## बौद्धिक काळ.

जातीच्या संस्थेपासून वाईट परिणाम घडूं लागले आणि ती राष्ट्रास उपायभूत न होतां अपायकारक झाली ही गोष्ट बौद्धधर्मावरून दिसून येते. बौद्ध धर्मांत केवळ विधिकलाप आणि यज्ञ यांचाच निषेध केला नाहीं, तर जातीचाही निषेध केला आहे. जर जात राष्ट्रीय वृत्तीची जीवन अवयव असती, तर गौतम आपल्या शिष्यांना, ह्मणजे एक हिंदू इतर हिंदूना उपदेश करीत असतां, जातीचा निषेध न करिता. बौद्धांच्या या मारांतून जात वांचली खरी, तरी या संस्थेपासून राष्ट्राच्या शक्तीचा ऱ्हास झाला, आणि त्याचे सर्व अवयव विस्कळित झाले, ही गोष्ट, हिंदु समाजाचा निभाव परचक्रापुढें लागला नाहीं, यावरूनच सिद्ध होते. वर्णव्यवस्थेनें शेवटीं राष्ट्र मोडलें हें खास.

श्री ... संग्रह

## अन्धतमिस्राचा काळ.

या नंतर एक दीर्घ काळ आला. हा अन्धतमिस्राचा काळ ह्मटला तरी चालेल. या काळांत जात ही जुनीपुराणी संस्था, वाडवडिलांची संपत्ति, जुन्या वैभवाची आठवण देणारी, ह्मणून तिला चिकटून राहिलेंच पाहिजे असा समज झाला. परंतु जात कशाकरितां झाली याचा कोणालाहि अर्थ ठाऊक नव्हता. हाही काळ गेला. नंतर

## ब्राह्मणधर्माच्या उद्धाराचा काळ

आला, त्यांत अनेक जाति, अनेक पोटजाति, संकर जाति, कीं ज्यांची संख्याही मोजतां येणार नाहीं, अशा होत गेल्या. या काळांत देशामध्यें अराजकता असल्यानें व जिकडे तिकडे बळी तो कानपिळी अशी दुःस्थिति झाल्यानें, हें जातीचें बंड अतिशयच माजलें.

## मुसलमानांचा काळ.

हा मुसलमानांच्या स्वारीच्या पूर्वी होऊन गेला. त्यांनीं हा देश जिंकल्यावर जात हा जित लोकांस एकच अभेद्य राष्ट्रीय दुर्ग राहिला. त्याच्या आड दडून हिंदूंना मुसलमानांवर मारा करितां येत असे. तेथून पुढें जातीचें जें हल्लीं स्वरूप दृष्टोत्पत्तीस येतें व ज्यामुळें समाजाच्या अवयवांस जणू कांहीं पक्षघात झाला आहे, असें स्वरूप जातीला आलें.

महाराष्ट्राच्या इतिहासामध्यें हे जातींचे कांहीं परिणाम चांगले निदर्शनास येतात. त्या परिणामांचीं कांहीं ठळक उदाहरणें थोडक्यांत सांगितलीं तर आपण मजला क्षमा कराल अशी उमेद आहे. सुधारकांना जात अडथळे आणिते याबद्दलचीं उदाहरणें हीं आहेत. खालच्या वर्णांतीलच तुकाराम आणि चोखामेळा इत्यादिक साधूंचा छळ झाला असें नाहीं तर ब्राह्मण वर्णांतीलही एकनाथासारख्या सुधारक साधूंचा छळ मूर्ख भटाभिक्षुकांनीं केला. सुधारणा करणाऱ्यांना भटाभिक्षुकांनीं त्रास द्यावा, त्यांचा छळ करावा, हा प्रचार प्रथम शंकराचार्यांपासून चालत आलाच आहे. शंकराचार्यांनाहीं त्यांनीं बहिष्कृत केलें होतें. ही बहिष्कृत अडचण दूर होईल तर सुधारणा जास्त सुखकर होईल.

## महारांचा छळ.

उच्च जातीच्या अहंमन्यतेनें हलक्या जातीच्या लोकांचा कसा छळ होतो, याचें एक उत्तम उदाहरण हें कीं पेशवाईत असा निर्बंध असे कीं, महार

रस्त्यांतून चालत असतां उच्च वर्णाचा मनुष्य कोणीही पुढें दिसला, तर आपली सावली त्यावर पडून त्याला विटाळ होऊं नये ह्मणून महारानें खालीं बसावें. कोणी कोणी तर असें सांगतात कीं, महारांना रस्त्यांत थुंकण्याचीही मनाई असे. रस्त्यानें जातांना त्यांनीं गळ्यांत एक मडकें बांधून त्यांतच थुंकावें. रस्त्यांत थुंकूं नये असा निर्बंध असे. पण हा छळ जेव्हां एकच जात प्रबळ झाली, त्यावेळीं होत असे.

## राजकीय प्रगतीचे वेळीं जातिनिर्बंध शिथिल होतात.

परंतु ज्या काळीं मराठ्यांच्या अंगीं खरें पाणी होतें, ह्मणजे जेव्हां मराठे, ब्राह्मण, आणि प्रभु एकमतानें एका कार्याकरितां झगडले, जेव्हां महार आणि कोळी इत्यादि नीच जातीशीं वरिष्ठ जातींना निकट संबंध ठेवावा लागला—कारण त्यांस एकमेकांशीं खांद्याला खांदा लावून लढावें लागत असे, जेव्हां हिंदु, मुसलमानांचे हातचें पाणी पीत आणि त्यांच्या पीरास आपल्या घरच्या देवतांतही स्थळ देत, त्या वेळेस हलक्या जातीचा छळ होत नसून वस्तुस्थिति अगदीं निराळी होती. राजकीय प्रगति झाली आणि देशाचें साम्राज्य वाढलें ह्मणजे प्रजाजनांच्या मनोवृत्ति कशा उदार होतात, याचें स्पष्टीकरण यावरून होतें. पण आपणांस यावरून हेंही दिसतें कीं, परकीयांचें भय कमी झाल्याबरोबर जाति—मत्सर पुनः वाढतो. याचें प्रत्यंतर, मराठी अमदानींतील शेवटल्या काळीं, कोंकणस्थ आणि देशस्थ यांच्यामध्यें झालेलेकज्जे, शेणवी आणि प्रभु यांच्यामध्यें झालेले मानाबद्दलचे वाद, आणि मराठा, प्रभु, ब्राह्मण यांच्यामधील मत्सर आणि बखेडे, यांमध्यें मिळतें.

## व्यवहारदृष्ट्या प्रश्न हा कीं आतां काय करावें? जात काढून टाकिली पाहिजे, प्रथम बाह्यस्वरूप मृदु करावें.

आतां व्यवहारिक प्रश्न आपणांस सोडवावयाचा तो हा कीं, आमच्या समाजास जखडून टाकणारा जातिभेदाचा अनिष्ट परिणाम काढून टाकावयाचा कसा? जात ही अत्यंत पुराण काळची संस्था असून ती पुष्कळ रीतीनें दूषित होऊन आतां अपायकारक झाली आहे, यांत कांहीं संशय नाहीं. तिच्यांतला उत्तम भाग अथवा गुण कधींच नाहींसा झाला आहे. सध्यां तिला जें दुष्टरूप आलें आहे, तें रूप कायम ठेवणें, अर्थात्च आपणास मान्य होणार नाहीं. साधारण विचार केला, तर ती संस्था निरर्थक झाली असतांही अद्यापि कशी टिकली आहे, याचें प्रत्येकास सहज आश्चर्य

वाटेल. जातिभेद काढून टाकावा असा अर्थात्‌च आमचा अंतिम हेतु आहे, असें जर एकदम करितां येत नसेल तर, असा आमचा निदानीचा स्तुत्य हेतु आहे, इतकें तरी जगापुढें स्पष्टपणें व धिटाईनें मांडलें पाहिजे. जातिभेद आजच मोडितां येत नाहींत. ह्मणून केवळ स्वस्थ बसण्यापेक्षां कांहीं तरी करणें बरें. ह्मणून जातिभेदाचीं बाह्य अंगें आणि तदंतर्गत लहानसहान गोष्टी या तरी काढून टाकाव्या हें आपलें कर्तव्य आहे. जातिभेदानें आपल्या नित्याच्या आयुष्यक्रमावर सदासर्वकाळ मोठें दडपण पडल्यासारखें होतें. सर्व लोकांमध्यें बंधुप्रीति उत्पन्न होत नाहीं ह्मणून सर्वजातींमध्यें दळणवळण आणि रोटीव्यवहार सुरू केला पाहिजे;आणि पोट जातींमध्यें तरी बेटी व्यवहार सुरू केला पाहिजे. जर आपण एवढी सुधारणा केली, तर आपणांतील कटु भेदाभेद आणि अडचणी नाहींशा होतील, एकोपा वाढविणें सोपें होईल व सुधारणेच्या पुष्कळ बाबीही सहजगत्या साध्य करून घेतां येतील.

## जातीमत्सर तरी कमी करा.

जातिभेदाचें बाह्य करडें स्वरूप अंशतः सौम्य केलें किंवा सर्वस्वीं काढून टाकलें ह्मणजे आमच्या समाजस्थितींतील सर्व किमया हातांत येईल, असें मात्र आपण समजूं नये. आमच्यांत असे पुष्कळ दोष आहेत कीं, जे जातिभेदाच्या बाह्य स्वरूपाविषयीं तिटकारा प्रदर्शित करितात, पण ज्यांचे अंतःकरणांत स्वजातीविषयीं अहंमन्यता खरोखर जागृतच असते ते आपण ब्राह्मण ह्मणून त्यांस मोठा गर्व वाटतो, किंवा आपली जात शिरगणतीच्या रिपोर्टांमध्यें क्षत्रिय ह्मणून लिहिली जावी अशाविषयीं ते आग्रह धरितात, अशा करितां कीं, आपण अस्सल आर्य आहों हें सर्वांस जाहिर व्हावें. सारांश, मनुष्यजातीचें वर्गीकरण करणाऱ्या शिरगणतीच्या रिपोर्टांसारख्याही ग्रंथांत जातिमत्सर आणि द्वेष प्रदीप्त करणाऱ्या गोष्टी यांना अस्थानीं स्थळ मिळतें. जात्याभिमानाचें हें एक नवें रूपच आहे. आपल्या अंतःकरणांतून हा भिन्नभाव समूळ नाहींसा करी तोंपर्यंत जातिभेदाचें बाह्य स्वरूप समूळ काढून टाकलें तरी कांहीं एक हित होणार नाहीं.

## आपल्या रीतीभातींमुळें समाजांतील विविध अंगांचा पुरासा उपयोग होत नाहीं.

### स्त्रियांची स्थिति कशी सुधारावी.

स्त्रियांची स्थिति आणि समाजांतील पद ह्या प्रश्नांत नेहमींच्या अनु-

भवांतील ज्या गोष्टींचा सामावेश होतो त्या सर्वांचा मला आजच विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. मला फक्त एवढेंच सांगावयाचें कीं, हल्लींच्या समाजस्थितीमुळें समाजांतील विविध अंगांचा पूर्ण उपयोग होत नाहीं. ही तिजविरुद्ध मुख्य तक्रार आहे.

## बालविवाह.

ज्या अर्थी विवाहाची सांगता अल्पवयी न व्हावी ह्मणून पूर्वी निर्वंध होते ते शिथिल होऊं लागले आहेत, त्याअर्थी बालविवाहापासून आयांचे आजार वाढतील व त्यांच्या आणि त्याचप्रमाणें अर्भकांच्या मृत्युसंख्येचें प्रमाण वाढून एकंदरींत समाज कमकुवत होईल. ह्या चालीमुळें स्त्रियांच्या शिक्षणासही व्यत्यय येतो.

## पडदा.

पडद्यांत राहाण्याच्या चालीमुळें स्त्रियांना समाजसुखाचा पुरासा अनुभव मिळत नाहीं व ह्याप्रमाणें समाजांतील स्त्रियांचें उत्साहजनक अंग कमी झाल्यामुळें समाजाला एक प्रकारची मंदता प्राप्त होते.

## स्त्रीशिक्षण.

स्त्रियांना शिक्षण न दिल्यामुळें आपण जाणून बुजून राष्ट्रांतील अर्धी शक्ति कमी करीत आहों आणि आपल्या मुलांना सुसंस्कृत आया न दिल्याचा ठपका आपण आपल्या शिरावर घेत आहों. त्याचप्रमाणें आपल्या आयांची शक्ति कमी झाल्यामुळें आपल्या समाजाची शक्ति कमी करण्यास आपण कारणीभूत होत आहोंत; व घरांतील स्त्रीपुरुषांच्या मानसिक स्थितींत महदंतर होऊन स्त्री पुराणप्रिय झाल्यानें हें एक सुधारणा शकटास अडथळा आणणारें साधनच आपण होऊन तयार करीत आहों.

## बहुपत्नीकत्व व विधवाविवाह.

पुष्कळ स्त्रिया करणें व विधवाविवाहप्रतिषेध ह्या चाली आपल्या समाजांत प्रसृत असल्यामुळें, आपली समाजरचना किती अव्यवस्थित आहे, हें दिसून येईल. पहिल्या चालीमुळें पुरुषांची नीतिमत्ता कमी होते; व दुसरीमुळें स्त्रियांमध्यें मात्र ती अगदीं उच्च तऱ्हेची असावी असा आपण आग्रह धरतों; व हा हेतु सिद्धीस नेण्याकरितां भूतदया व प्रेम ह्या उच्च मनोवृत्तींस बाजूला ठेवून विधवांचा शारीरिक जोम कमी करण्याचे

आणि त्यांचा नैसर्गिक मोहकपणा कमी करण्याचे हेतूनें, त्यांजकडून बरींच कष्टप्रद व्रतें करवितों. इतकें करूनही स्त्रियांचें आचरण अगदीं पवित्र असावें ही आपली इच्छा सफळ होत नाहीं. व सृष्टिनियमांचें उल्लंघन केल्यामुळें त्याबद्दल आपणास शासन मिळाल्यावांचून राहत नाहीं, कारण ह्याप्रमाणें मोठ्या कडक उपायांचें जरी आपण अवलंबन कारितों तरी ह्या वर्गांतील स्त्रियांत अगदीं साधारण अशी नीतिमत्ता देखील आपणांस राखितां येत नाहीं. ह्याकरितां अशा घातक चालींविषयीं ओरड करून त्या बंद करण्याविषयीं आपण प्रयत्न करीत आहों ही गोष्ट फार सामाधानकारक आहे.

## स्त्रियांची स्थिति व समाजांतील पद.

तथापि मुळांत कोठें चुकतें आहे ह्याचा आपण नक्की तपास लावला पाहिजे. स्त्रीजात व स्त्रीपुरुषसंबंध ह्या प्रश्नासंबंधीं आपल्या कल्पना कोत्या असल्यामुळें ही चूक आपणांकडून घडत आहे.

## इतिहास.

वैदिक काळांतील स्त्रीजातीच्या स्थितीचें सविस्तर चित्र आपणांस उपलब्ध नाहीं, तरी जें थोडेंसें उपलब्ध आहे त्यावरून आपणास दिसून येईल कीं, आर्य लोकांच्या इतर शाखांतल्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील आर्यशाखेंतही गृहिणीचें पद स्वातंत्र्याचें असून त्यांना मान मिळत असे. त्यानंतरच्या वीर–काळांत व त्याप्रमाणेंच ज्या काळांत विचारास प्राधान्य प्राप्त झालें, त्याकाळीं स्त्रियांची स्थिति कशी होती ह्या संबंधानें आपणांस उपलब्ध असलेलें चित्र अधिक स्पष्ट आहे. हल्लींच्या युरोपांतील स्त्रियांपेक्षां जरी त्या काळांतील स्त्रियांस अधिक एकांतवास असे तरी त्यांना बरेंच स्वातंत्र्य दिलें जात असे. त्यांना संस्कृत शिक्षण आणि कलाकुशलतेचें ज्ञान दिलें जात असे. कित्येकांची मजल शास्त्र व तत्त्वज्ञान ह्यांत पारंगतता मिळविण्यापर्यंत येऊन ठेपली होती. नवऱ्याला संसाररूपी गाडा हांकण्यांत सहाय्यकारी होऊन खरी पतिव्रता बनावी अशा तऱ्हेचें वळण त्याकाळीं स्त्रियांना लावण्यांत येत असे. ह्या कारणामुळें इंग्लडांतील स्त्रियांच्या मानानें त्या काळच्या स्त्रियांची स्थिति फारशी मागसलेली नव्हती; या कायद्याच्या दृष्टीनें तर ती पर्वापर्यंत अधिक उच्च होती. सन १८७० सालीं झालेल्या एका कायद्यानें इंग्लंडांतील स्त्रियांना वैवाहिक स्थितींत

स्वतःची अशी मालमत्ता संपादन करण्याचा जो हक्क प्राप्त झाला, तो आमच्याकडील स्त्रियांना मिताक्षरेच्या कर्त्यानें पूर्वीच दिलेला होता.

## बौद्धकाळ.

बौद्धकाळांत मात्र स्त्रियांच्या स्थितींत फरक झाल्याचें त्या काळच्या वाङ्मयावरून दिसून येतें. स्त्रियांना वेदाध्ययनाची मनाई झाली, पण ह्या नियमास कांहीं अपवाद असल्याचेंही दिसून येत आहे. तथापि पारमार्थिक गोष्टींचें ज्ञान संपादन करण्यासंबंधानें स्त्री व पुरुष ह्यांना समान हक्क आहे असें त्या वेळींही मानीत. मनु व इतर ग्रंथकार ह्यांच्या ग्रंथांत स्त्रियांना त्यांच्या इच्छेविरुद्ध सुद्धा संन्यासव्रत अंगीकारावयास लावावें ह्या अर्थाच्या वचनाबरोबरच त्यांजविषयीं पुरुषांच्या मनांत असलेला आदर व पूज्यबुद्धि व्यक्त करणारीं वचनेंही उपलब्ध आहेत. सीता रामचंद्राची साहाय्यकारिणी होती ह्या कल्पनेपेक्षां ती त्याच्या आज्ञेंत वागणारी पतिव्रता होती ह्या कल्पनेस ह्या काळांत प्राधान्य मिळालें. व स्त्रियांनीं एकांतांत रहावें ही कल्पना दृढ होत चालली आणि विधवाविवाहाची चाल बरी नव्हे, असें लोकमत बनूं लागलें, तथापि ह्या काळींहि स्त्रियांना शिक्षण देण्यांत येत असे व एकंदरींत त्यांजविषयीं पुरुषांच्या मनांत आदर वसत असे.

## परकीयांच्या स्वाऱ्या.

पुढें परकीयांच्या स्वाऱ्या झाल्या व अज्ञानांधकारानें समाज व्यापून टाकला त्या काळीं मात्र बराच बदल झाला. स्त्रीनें पतिसेवेंत तयार असावें ही जी उच्च कल्पना पूर्वीं अस्तित्वांत होती, तिला ह्या काळीं नसतें महत्व मिळाल्यामुळें स्त्रियांचे आचारविचार त्या कल्पनेला अनुरूप असे बदलले. ह्यामुळें सती जाण्याची चाल, विधवाविवाहाचा अत्यंत प्रतिषेध, बालविवाह व इतर घातुक चाली ह्या आपल्या समाजांत चालू झाल्या आणि हिंदुस्थानांतील कांहीं भागांत मुसलमानांपासून घेतलेली पडद्याची चाल प्रचारांत आली, पुरुषांमध्यें अज्ञान वाढलें व स्त्रियांचें मन तर केवळ अंधकारमय झालें.

## आमच्या मनांतील उदात्त कल्पना.

ह्या दोन्ही महत्वाच्या प्रश्नासंबंधानें कोणती उदात्त कल्पना साध्य करून घेण्याविषयीं आपण प्रयत्न करीत आहों ? हें साध्य नवीन नाहीं

...ठी ग्रंथ संग्रहालय...

किंवा हल्लींच्या समाजस्थितींत केवळ उलाढाली घडवून आणणारेंहि नाहीं. आमचा खरा हेतु आमच्या पूर्वजांनीं मनापुढें ठेविलेला उदात्त, सुंदर व मनुष्यजातीनें साध्य करून घेण्यास योग्य अशीच कल्पना साधावयाची आहे ज्या रूपानें ती आपणांसमोर येते ती एकाच रूपानें येत नाहीं. पण आपणांस मूळ कल्पनेकडे लक्ष द्यावयाचें आहे, तिच्या बदलणाऱ्या रूपांकडे नव्हे.

## जातिभेदान्तर्गत तत्व.

उदाहरणार्थ जातिभेदांतर्गत तत्व कोणतें ? ज्यामुळें मनुष्याला ह्या जगांत आपल्या योग्यतेनुरूप काम, धन व मान हीं संपादितां येतील, तें व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्व स्थापित करणें हें होय. अनेक व्यक्ति एकत्र होऊन त्यांना समाजाचें व्यवस्थित रूप मिळून त्यांचा परस्पर संबंधही न्यायाचा करावा हें तत्वहि आपणांस स्थापावयाचें आहे. आपणाला पुढील ऋचा अगवत असेलचः—

ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ।

प्रत्येक समाजांत ज्या निरनिराळ्या शक्ति अस्तित्वांत असणें अवश्य आहे त्यांचें रूप वरील ऋचेंत किती सुंदर तऱ्हेनें साधलें आहे ? मात्र एका मुद्याकडे आपण लक्ष द्यावें अशी आपणास विनंति आहे. ज्याप्रमाणें शरीरांतील एका अवयवाची योग्यता दुसऱ्या अवयापेक्षां कमी किंवा अधिक नाहीं, किंवा त्याची आवश्यकता दुसऱ्यापेक्षां कमी किंवा अधिक नाहीं त्याचप्रमाणें एक जात कमी व दुसरी वरची असेंही होऊं शकणार नाहीं.

## सृष्टिनियमांप्रमाणें वरिष्ठ कनिष्ठाचा निर्णय होतो.

जुन्या काळची जातिभेदव्यवस्था निरनिराळ्या मनुष्याच्या गुणधर्मांच्या भेदावर रचिली असेल तर सृष्टिनियमांसच हवी तशी व्यवस्था आतांही घडवून आणूंद्या. सांप्रतचे मनूंत प्रसृत असलेल्या कृत्रिम जातिनिर्बंधांना सृष्टीच्या नियमांचें बंधन करूं देऊं नका.

## जात ही उत्क्रांतीची अवश्य पायरी होय.

अर्थात् कोणतीही संस्था पूर्णत्वास पोंहोंचलेली किंवा कायमची असूं शकणार नाहीं. मग ती ईश्वरानें ठरविलेली आहे हें ह्मणणें लांबच राहिलें. फक्त हिंदुस्थानांतच जातिभेद निर्माण होऊन लयास गेला असें नाहीं. पेरू,

इजिप्त, सोळाव्या शतकाचे सुमारास युरोपांतसुद्धां, अशा तऱ्हेच्या संस्थांचा उदय होऊन लय झाल्याचें दिसून येतें.

## नैसर्गिक नियमानुसार तिची वाढ होऊन अखेरीस तिचा लय होतो.

समाजांतील इतर संस्थांप्रमाणें जातिभेदाचें विशिष्ट स्वरूप समाजाच्या त्या त्या समयींच्या स्थितीस अनुरूप असतें. कांहीं काळपर्यंत तो भेद हितकर असतो, पुढें कांहीं काळपर्यंत त्याला क्षय जडलेला असतो व अखेरीस त्याचा लय होऊन त्या जागीं सुधारलेल्या काळास जास्त अनुरूप अशी निराळी संस्था अस्तित्वांत येते, व तिच्या योगानें व्यवहारांतील सदासन्मान्य अशा उदात्त कल्पना जास्त सुखकर रीतीनें व उत्साहानें अमलांत आणितां येतात.

## हीच गोष्ट स्त्रियांच्या स्थितीस लागू आहे.

हीच गोष्ट स्त्रियांच्या स्थितीस लागू आहे. जी स्थिति प्राप्त झाली असतां आपल्या देशांत पूर्वीप्रमाणें उदार स्त्रिया अवतरतील अशी स्थिति प्राप्त करून घेण्याविषयीं आपला प्रयत्न चालू आहे. पूर्वीचीच स्थिति पुनः प्राप्त होण्याची आवश्यकता नाहीं. आतां काळ बदलला आहे व जगही निराळें बनलें आहे; तरी आमचा उद्देश, आमचें साध्य हीं एकच आहेत; व तीं घडवून आणण्याबद्दल आपण प्रयत्न करीत आहोंत.

## साध्य खरें करून दाखवा, त्याच्या स्वरूपाबद्दल काळजी घेण्याची जरुरी नाहीं.

सर्व गोष्टींचें सार ह्यांत आहे. परंतु सध्यांचें स्वरूप हेंच साध्य आहे अशी आमची चुकीची समजूत आमच्या अज्ञानामुळें होते. हें साध्य खरें करून दाखवा. त्याच्या स्वरूपाबद्दल काळजी करण्याची आवश्यकता नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांच्या मनांवर हीं नेहमींचीं तत्त्वें बिंबवा. ह्मणजे मग जातिभेद व स्त्रियांची स्थिति ह्या कमी महत्वाच्या प्रश्नांचा उलगडा आपोआपच होईल. आपल्या हल्लींच्या अवनत स्थितीचीं कांहीं कारणें सामाजिक नसून भिन्न आहेत—ह्मणजे कांहींचें मूळ आपल्या सांपत्तिक स्थितींत आहे. कित्येकदां आपणास काय हवें ह्याविषयीं निश्चय नसून जें जुनें व आपल्या नेहमींच्या वहिवाटींत आहे, त्याला आपण

[library stamp]

चिकटून रहात असल्यानें अवनति झाल्याचें दिसून येतें. तेव्हां हिंदुस्थानाला हल्लीं कशाची उणीव आहे, त्याच्या पूर्वीच्या संस्था कोणत्या होत्या व त्यांचा हेतु काय होता, ह्याचें जर आपणांस यथार्थ ज्ञान झालें व त्याचप्रमाणें आपल्या देशाच्या राष्ट्रीय जीविताकरितां नवीन कल्पना कोणती लागू पडते हें जर आपण पक्कें ठरविलें, तर त्या कल्पनेस नक्की स्वरूप कोणतें द्यावें, ह्याचा विचार पुढील काळावर सोंपवावा; कारण उत्क्रांतितत्त्वानुरोधानें मनुष्यजातीला सुधारणेकडे ओढणाऱ्या ज्या शक्ती आहेत, त्या सदर्हु कल्पनेस आवश्यक असें रूप कालांतरानें देतील अशी आपण खात्री बाळगावी.

## सामाजिक प्रगतीचे नियम.

### समाजघटनेचे नियम.

समाजाचें अध्ययन ज्या नियमास अनुसरून करण्यांत येतें, त्यांचें अवलोकन प्रथमत: थोडक्यांत केलें असतां बरें होईल; कारण त्यावांचून सामाजिक प्रश्नांचें सूक्ष्म ज्ञान होत नाहीं. आपणास अवगत आहेच कीं, व्यक्तीप्रमाणें समाजाचें जीवित ह्मणजे त्याच्या अंशत: चल व अचल अशा परिस्थितीशीं संतत चाललेला कलह होय. त्या परिस्थितीचीं अंगें ह्मटलीं ह्मणजे हवामान, नैसर्गिक स्थिति व भौक्तिक शक्ति हीं होत. उ०— सांपत्तिक स्थिति, देशाची स्वाभाविक व राजकीय परिस्थिति व सुधारलेल्या राष्ट्रांशीं संबंध हीं होत. समाजास आपल्या परिस्थितीशीं जो झगडा करावा लागतो, त्यांत त्याचें मुख्य शस्त्र ज्ञान हें होय. ह्यावरून आपल्याला स्मरत असेलच कीं, समाजाच्या

### ज्ञानाची वाढ

व्यक्तीच्या प्रमाणेंच, त्याच्या ज्ञानेंद्रियांच्या वाढीबरोबरच होते. ह्मणजे तो प्रथम निरनिराळ्या साध्या गोष्टी फक्त नमूद करितो. नंतर त्याच्या अंगीं जास्त संकीर्ण गोष्टी नमूद करण्याची शक्ति येते व अखेरीस त्यांचें वर्गीकरण करून त्यांजपासून सिद्धांत काढण्याची शक्ति त्याला प्राप्त होते.

जसजसें त्याचें ज्ञान वृद्धिंगत होतें तसतशी त्याच्या अंगीं आपल्या परिस्थितीला आपल्या ताब्यांत आणण्याची शक्ति येऊं लागते. कारण मग त्याला कार्य व कारण ह्यांचें बरोबर ज्ञान होऊं लागतें व त्यामुळें त्याला कारणाकडून इष्ट कार्य घडवून आणतां येतें.

दुसरें हेंही आपण ध्यानांत बाळगिलें पाहिजे कीं, समाज हा एकटाच असत नाहीं. त्यालाही व्यक्तीप्रमाणेंच इतर समाजांशीं युद्ध करून आपलें वर्चस्व

## उत्तमांचें तगणें.

स्थापित करावें लागतें. ह्या युद्धांत अर्थातच जे सर्वांत उत्तम असतील तेच समाज तगतात. तगण्यांत सर्वांत उत्तम ह्याचा अर्थ असा आहे कीं त्याची व्यवस्था अति उत्तम आहे व त्यानें पुरें ज्ञान संपादून तें आपलेंसें करून त्याचा उपयोग त्या समाजाला आपल्या सर्वांगांनीं स्वतःस नवीन परिस्थितींत अनुरूप करून घेण्याकडे करितां येतो.

## समाजस्थितीचीं निराळीं स्वरूपें.

व्यक्तीचे आपल्या परिस्थितीशीं नानाप्रकारचे संबंध असतात. त्यांपैकीं कांहीं, समाजाचा एक घटक अवयव ह्मणून असतात, उ० अमक्या वर्गाचा, अमक्या ज्ञातीचा किंवा नवरा अगर बायको; कांहीं संबंध त्याची दुसऱ्याशीं जी सांपतिक चढाओढ चालू आहे, तिजमुळें असतात व कांहीं तो राज्यांतील एक अवयव ह्मणून झालेले असतात.ह्याचप्रमाणें समाजाचींही सामाजिक, सांपत्तिक व राजकीय अशीं निरनिराळीं स्वरूपें असतात व ह्या जीवनकलहांत ह्यापैकीं कोणत्याही स्वरूपाची हेळसांड समाजास करतां येत नाहीं.

## त्याजमध्यें समतोलपणा पाहिजे.

हे संबंध न्याय, समान हित व ह्या तत्त्वांनीं बद्ध असले पाहिजेत. हीं तत्त्वें समाजाच्या राजकीय, सांपत्तिक, सामाजिक ह्या तीन्ही अंगांच्या व्यवस्थेंत समतोल रीतीनें वास करीत असलीं पाहिजेत. हें नाजूक पारडें समतोल न रहातां कोणत्याही एका बाजूस खालीं गेलें तर त्या समजाची अवनति होईल.

## पारड्यांचा समतोलपणा नाहींसा झाला असतां नसतीं संकटें उद्भवतील.

व त्यांची व्यवस्था सुयंत्रित नसल्यामुळें त्यांत नसतीं संकटें उद्भवतील. ह्याचें कारण हल्लींचा जातिभेद होय; आणि हें पारडें पुनः समतोल होईपर्यंत तो समाज कमकुवत राहील. त्यांतील निरानिराळ्या अंगांत एकोपा न राहिल्यानें तो अक्षयी मागसलेला राहील. ह्यामुळें अर्थातच तो समाज त्यापेक्षां जास्त सुव्यवस्थित अशा इतर समाजाला वशंगत होईल.

## या नियमावरून वर्तणुकीचे धडे.

समाजशास्त्राच्या या विश्रुत तत्वांवरून आपण वर्तणुकीचे कोणते धडे घ्यावयाचे? पहिला धडा हा कीं, प्राचीन विचेस अथवा ज्ञानास चिकटून बसणें व ज्ञानाच्या प्रकाशास रिघाव देणें, ह्मणजे केवळ आत्महत्यादिपणा होय. पूर्वीच्या ज्ञानानें सर्व गोष्टींची धर्माशीं सांगड घातली होती. नवीन ज्ञानानें जीविताचें वर्गीकरण करून ज्या आध्यात्मिक उन्नतीशीं धर्माचा वस्तुतः संबंध आहे, तीच त्याची मर्यादा ठरविली आहे.

## ज्ञानाच्या प्राचीन आकुंचित स्थितीस चिकटून राहण्यांत अर्थ नाहीं.

जुन्या अपरिपक्क पद्धतीस चिकटून राहून, नेहमींच्या सवडीच्या गोष्टींस व आध्यात्मिक कल्याणाचा अर्थाअर्थी संबंध नाहीं अशा गोष्टींस धर्माचें गंभीर शासन लागू करण्यांत काय फायदा आहे? यापासून वागणुकींत अडचणी येऊन जीवित कष्टमय मात्र होतें, हीं बंधनें अतिशय त्रासदायक होतात आणि त्यापासून नीतींत बिघाड होतो तो असा कीं, तीं धर्मबंधनें मोडणें अक्षम्य आहे असें मानीत असूनही तीं मोडण्याची आपणांस संवय होते आणि अनेक साधारण निरुपद्रवी कृत्यांस गुप्त दुर्गुणांचें स्वरूप प्राप्त होतें. दोन्ही प्रकारांनीं शेवटीं दुटप्पीपणाच्या वर्तनाचें आपणांस कांहींच वाटत नाहींसें होतें.

## कार्यकारणांच्या यथार्थ ज्ञानाची आवश्यकता.

दुसरा धडा घ्यावयाचा तो हा कीं, सृष्टिनियमांचें विशेष यथार्थ ज्ञान होण्याची जरूर आहे. वेड्या व भोळसर समजुतीस धरून न बसतां आपण ज्ञानाची तर्कशास्त्रावर जुळणी केली पाहिजे. कार्यकारणभावाविषयीं व शकुन, ज्योतिष व सामुद्रिक इ. विषयीं आमच्या लोकांच्या किती विचित्र प्रकारच्या कल्पना आहेत, यांची कांहीं प्रचारांतील

## धर्मभोळ्या समजुती सुटल्या पाहिजेत.

उदाहरणें घेऊं. अंगावर पाल पडली असतां कांहीं तरी संकट यावयाचें, कांहीं प्रसंगीं विधवा पुढें आली असतां तिचें दर्शन अशुभ होतें, जन्मपत्रिका मिळवून पाहून लग्न ठरविणें उत्तम होतें, शरीरावरील कित्येक चिन्हांवरून मनुष्याचे स्वभाव व भविष्य कळतें, गंगास्नानानें व ब्राह्मणांस दक्षिणा दिल्यानें मनाची व आत्म्याची शुद्धि होते, केवळ आपल्या वर्तनानें

होत नाहीं अशीं अनेक उदाहरणें सांपडतील. आपल्या दिनचर्येंतही जेवतांना सोंवळें नेसलें पाहिजे असले धर्माचे निर्बंध किती तरी प्रबल आहेत. हीं सर्व आकुंचित मानसिक स्थितींचीं स्पष्ट लक्षणें होत, आणि लहानसहान बाबतींत या आकुंचितपणास उत्तेजन मिळाल्यास मोठमोठ्या प्रसंगींही त्यांचा अम्मल आपणावर राहीलच. ज्या समाजांत या धर्मभोळ्या समजुती अव्याहत चालू रहातील, तो समाज आपल्या सामाजिक व्यवस्थेंत कार्यकारणभाव समजण्यास असमर्थ राहील. लहान मोठ्या सर्वच बाबतींत आपणांस धर्मभोळेपणा सोडला पाहिजे. आणि ज्यांत साधनें व तर्कदृष्ट्या संबंध असेल, अशा धोरणांवर वागणूक ठेविली पाहिजे.

## नवीन ज्ञान नेहमीं आपलेंसें केलें पाहिजे.

पुढील धडा ह्मणजे नवीन ज्ञान—मग तें देशांतल्या देशांत असो, किंवा बाहेरून आलें असो—तें प्राप्त करून आपलेंसें करून टाकणें हा होय. तीरकमठा वापरणाऱ्या समाजाचा अर्वाचीन रायफल बंदुका वापरणारांशीं सामना झाला असतां, त्या समाजानें स्वरक्षणाकरितां नवीन आयुधेंच घेतलीं पाहिजेत. दुसऱ्या गोष्टींतही हेंच तत्व लागू आहे. ज्ञानाचें बुद्धीनेंच आकलन करणें बस्स नाहीं; तर त्याच्या अनुरोधानें आपल्या चालीरीती व वर्तणुकींत फेरफार करण्याचें नैतिक धैर्यही पाहिजे; नाहींतर आपल्या ज्ञानाचा व्हावा तसा उपयोग होणार नाहीं. कारण कीं संसारांतील बिकट प्रसंगांत समाजास साधनीभूत व उपयुक्त होणें हेंच ज्ञानाचें खरें चिन्ह होय, आणि ह्मणूनच जर जीवनार्थ कलहामध्यें आमच्या चालीरीतींपासून तोटा होत आहे, तर त्या केवळ आपल्या व जुन्या आहेत ह्मणून त्यांस धरून बसणें अत्यत अनिष्ट आहे.

## सामाजिक सुधारणा हा पुनर्रचनेचा एक भाग आहे.

शेवटील धडा हा कीं सामाजिक सुधारणेचे भावी परिणाम व आवश्यकता यांस फाजील महत्व देतां नये. आपला समाज चिरायु होण्याकरितां त्याची पुनः रचना करावयाची तर सामाजिक, सांपत्तिक आणि राजकीय या तिन्हीं बाबतींत आपलें पाऊल पुढें पडलें पाहिजे.

## परिस्थितींत झालेली क्रांति.

शास्त्रीय ज्ञान आणि पाश्चिमात्य सुधारणा यांनीं आपणांस अगदीं नवीन परिस्थितींत आणून सोडलें. पूर्वीं इतर देशांशीं आपल्या देशाचा संबंध

259

नव्हता. सांपत्तिक साधनें आमचीं आह्मांस पुरेशीं होतीं. सामाजिक स्थितींत आमचा इतरांशीं संबंध नव्हता. आमच्याच विवक्षित संस्था आह्मीं पूर्णदशेस आणण्यास समर्थ होतों. आणि राजकीयदृष्ट्या आमचें एक स्वतंत्र खंडच होतें असें ह्मटल्यास चालेल. बाहेरून जें जें येईल तें तें शोषून घेऊनही आमच्या स्वतःच्या रचनेंत रूपांतर करण्याइतका फरक कधींच झाला नाहीं. ही सर्व स्थिति आतां बदलली. सांपत्तिक आणि सामाजिक बाबतींत जास्ती निपुण, आणि ऐक्य व व्यवस्था यांत श्रेष्ठ अशा समाजांच्या चढाओढीच्या तडाक्यांत आपण सांपडलों आहों. आतां एकांतस्थितीपासून होणारा बचाव आपणांस राहिला नाहीं. आमचा देशच काय तें जग, असें जें आह्मांस वाटत होतें, ती कल्पना नवीन शास्त्रीयज्ञानानें पार उडवून दिली आहे. जगाविषयीं आमच्या कोत्या कल्पनांची तटबंदी शास्त्रीयज्ञानानें फोडून टाकिली आहे आणि आमच्या लहानशा जगास जगांतील एक प्रांत बनविलें आहे.

**आह्मांस पूर्वीं यश न येण्याचें कारण या क्रांतीकडे दुर्लक्ष्य हें होय.**

नवीन परस्थितीचा आह्मांवर प्रथम पगडा बसत चालला, तेव्हां ही गोष्ट आपल्या पूर्णपणें लक्षांत आली नाहीं. कवाइती, युरोपियन सैन्यें व सुव्यवस्थित राज्यकारभार यांशीं सामना झाला असतां महादजी शिंदे, हैदरअली आणि रणजितसिंगासारख्या अलौकिक पुरुषांनीं आपली सैनिक व्यवस्था टाकून देऊन परकीयांची सैनिक व्यवस्था स्वीकारिली. परंतु सर्व गोष्टींत अशाच प्रकारें फेरफार करणें अवश्य आहे, हें कोणच्याही एतद्देशीय राजांच्या लक्षांत आलें नाहीं आणि यामुळें जीवनार्थ कलहांत त्यांचा चुराडा झाला. आतां तरी असा फेरफदल करण्याची आवश्यकता आपण लक्षांत बाळगली पाहिजे.

**आतां ती क्रांती आपण लक्ष्यांत ठेविली पाहिजे, आणि जबरीनें नव्हे पण मुदाम तदनुरूप फेरबदल केला पाहिजे.**

आपली सांपत्तिक रचना जास्त लवचिक आणि सज्ज केली पाहिजे. आणि ज्या चालीरीतींनीं आह्मांस शरीरानें दुर्बल व निष्प्रयत्न केलें आहे, आणि विशेषेंकरून ज्या समाजव्यवस्थांनीं व ग्रहांनीं मनुष्य, जाति व धर्म यांत भिन्नभाव करून सोडला आहे, त्या चालीरीती, व्यवस्था व ग्रह यांचा आह्मांस त्याग केला पाहिजे. प्रवाससौकर्य आणि अवश्यभावी

———— हीं आपणांस पुढें ढकलीत आहेत. मग आमची संमति असो अगर नसो. या प्रगतीला उपयोगी पडेल अशा नवीन ज्ञानाचें भांडार शास्त्राच्या योगानें आपणांस प्राप्त झालें आहे. अपरिहार्य ह्मणून ढकललें जावें किंवा इष्टप्राप्तीच्या साधनांची योग्य व बुद्धिपुरःसर निवड करून या क्रांतीपासून होईल तितका जास्त लाभ करून घ्यावा, इतकेंच ठरविण्याचें आतां उरलें आहे.

## भौतिक शक्ती निरर्गल आहेत, असें मत.

या जीवनार्थ कलहांतून टिकाव धरून आपण अस्तित्वांत राहूं कीं काय अशी आपल्यापैकीं कित्येकांस शंका आहे. जातींचा कमजास्ती टिकाऊ-पणा, भौतिक शक्तींचें निरर्गलत्व व विशेषेंकरून हवामानाचा परिणाम, यांवर समाजाचें आयुष्य अवलंबून आहें, अशा युरोपियन मतांचा हे लोक आश्रय घेतात. कर्माच्या विपरीत भावनेमुळें प्रारब्धवादाची जी पूर्वीची कल्पना होती, तिच्याच जागीं शास्त्रांच्या विपरीत भावनेमुळें ही प्रारब्ध वादाची नव्या रूपानें कल्पना आली आहे; आणि ही जेथें दृष्टीस पडेल तेथें हाणून पाडली पाहिजे.

## हवामान विरुद्ध असतांही आमच्या पूर्वजांनीं मोठमोठीं कृत्यें केलीं.

हीं मतें जर खरीं असतीं, तर सुधारणेच्या इतिहासांत आमच्या समाजानें जो भाग घेतला, तो कधींच घेतला गेला नसता. आमच्या लोकांनीं अशाच हवामानांत राहून धर्म, मीमांसा, शास्त्रें, शिल्पकला, कला, आणि वाङ्मय, या विषयांत जेथपर्यंत मजल येऊन पोचविली, तेथपर्यंत कोणत्याही समकालीन राष्ट्रानें पोंचविली नाहीं. आमच्यांत कवी, तत्वज्ञानी, पंडित व शास्त्री होऊन गेले इतकेंच नाहीं, तर इतिहासांत प्रख्यात असे राज्यधुरंधर व अग्रणी पुरुष निर्माण झाले व असे पुरुष चंद्रगुप्त, अशोक, विक्रमादित्य, सेन व गुप्त यांच्या कालींच नव्हे, तर मोंगल राज्यांतही मोठमोठे योद्धे व राजकारणी पुरुष झाले व शिवाजी मराठी राज्यांतील अग्रणी, आणि रणजितसिंह यांच्या कालींही झाले.

## युरोपचें श्रेष्ठत्व आधुनिक व शास्त्रीय व्यवस्थेचें फळ आहे.

युरोप आजकाल श्रेष्ठत्वाच्या शिखरावर आहे हें खास; परंतु तें तसेंच राहील असा सनातन व अढळ नैसर्गिक नियम आहे कीं काय? अशा

कुतर्कांच्या शास्त्रीय मानांस इतिहासाचा आधार आहे काय? उलट असेंच दिसून येईल कीं, अलीकडील तीनशें वर्षांतच बेकनप्रभृतींनीं शोध लावल्यापासून पाश्चिमात्य प्रजांस थोडक्या प्रयत्नानें पुष्कळ कार्यभाग उरकण्याचें व जीवनव्यवहार तर्कशास्त्राच्या तत्वावर कसा चालवावा हें साधलें, आणि युरोपची जगांतील इतर भागांवर सरशी झाली. हवापाण्यामुळें अगर भौतिक कारणांमुळें किंवा आमच्या स्वगत दुर्बलतेमुळें त्यांची ही सरशी झाली असें नव्हे, तर राजकीय, सामाजिक व सांपत्तिक जीवनव्यवहार जास्त शास्त्रीय पद्धतींवर ग्रथित झाल्यानें झाली.

## आमची नैसर्गिक साधनसामुग्री.

त्यांनीं घालून दिलेल्या उदाहरणाचें अनुकरण केलें असतां आमचेंही पाऊल पुढें पडेलच. आमचीं नैसर्गिक साधनें उत्कृष्ट प्रकारचीं आहेत. रजपूत, मुसलमान, शीख, गुर्खे, व मराठे यांसारखे योद्धे; ब्राह्मण कायस्थ वगैरे बुद्धिमान् राजकारणी मुत्सद्दी; वाणी व भाट्ये, बोहरी, मेमण व पारशी यांसारखे व्यापारकुशल लोक; काटकसर, सोशिकपणा, हुषारी, मायाळूपणा, कुटुंबप्रीति व व्यवस्थितपणा इत्यादि समाजजीवनास पोषक अशा गुणांनीं अनेक युरोपीयन प्रजांस मागें सारील असा शेतकरीवर्ग; अशीं उत्कृष्ट साधनें असूनही आमचें जीवन कोणत्या धर्तीवर चाललें आहे?

## आमच्या अपयशाचीं कारणें कर्म व आमची दूषित समाजव्यवस्था हीं होत.

याचें कारण आमच्यांतील नैसर्गिक उणीवा हें नव्हे. तर दूषित समाजव्यवस्था, सध्याच्या मनूस अयोग्य अशा जुन्या पद्धती, आणि आमचें स्वतःचें कर्म हीं होत. नैसर्गिक सहानुभूति आणि परस्पर सहाय्य यांची पवित्रता आपल्या लक्षांत येत नाहीं आणि समाजाचें हित ह्मणजे व्यक्तिहिताची वरिष्ठ पायरी होय हें आपणांस समजत नाहीं. आमच्या कृतींच्या आणि संस्थांच्या मुळाशीं न्याय आणि समदृष्टी हीं नसून मेहेरबानी व विशिष्ट हक्क हीं असतात. नवीन मिळालेलें ज्ञान आणि नवी परिस्थिति यांस अनुरूप होतील अशा तऱ्हेनें आमच्या रीति व आमच्या कल्पना सुधारल्या पाहिजेत. सुधारणेचें मुख्य तत्त्व हेंच, आणि तें जर आपण व्यवहारांत अमलांत आणलें, तर मग नैसर्गिक शक्तीचें आपणास भय

वाळगण्यास नको. कारण त्या शक्ती शास्त्रबलानें आणि मानवी प्रयत्नांनीं आपल्यास नेहमीं वश करून घेतां येतात.

## आमचें दैव आमच्याच हातीं आहे.

आमची भावी स्थिति आमच्याच हातांत आहे. ती नैसर्गिकशक्ति, प्रारब्ध, दैव किंवा भवितव्यता यांवर अवलंबून नाहीं. या गोष्टींचे आपण फुकट देव्हारे माजविले आहेत, आणि आपण केलेल्या कर्मांची जबाबदारी विनाकारण त्यांजवर लादतों. गृहस्थहो, आपणांस निक्षून सांगतों कीं, पुरुषार्थ थोर आहे आणि आपलें भविष्य आपल्या स्वाधीन आहे. आह्मांस ज्ञानानें जीं साधनें प्राप्त होतात त्यांचा वेळीं सदुपयोग केला ह्मणजे आपलें भविष्य आपल्यासच ठरवितां येतें.

## रीति.

### विद्येचा जास्त प्रसार होण्याची आवश्यकता.

आमच्या परिस्थितींत झालेल्या नवीन अनुकूल घटनांचा उत्तम उपयोग करून घेणें असेल, तर आपणांस विद्येचा जितका अधिक प्रसार करवेल, आणि ती विद्या जितकी व्यवहारोपयोगी करतां येईल तितकी केली पाहिजे. देश अज्ञानांत गढून गेला आहे तर आमची सामाजिक प्रगति अगदीं मंदगतीनें होत आहे. हें अज्ञान काढून टाकलें पाहिजे. येथें सुधारणा व सुधारक यांजविषयीं जी वृत्ति लोक धारण करतात, त्याविषयीं दोन शब्द बोलल्याशिवाय रहावत नाहीं. सुधारणेविषयीं अत्यंत वक्तृत्व करून तदनुरूप वर्तन घडलें नाहीं, अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात. बोलल्या प्रमाणें चालले नाहींत, यामुळें कांहीं त्यांच्या विधानांतील सत्यांशाचा अपलाप होत नाहीं. मात्र हें खरें कीं, जर उक्त्यनुरूप त्यांची कृति असती तर त्यांची थोरवी फारच वाढली असती. कवि तुकाराम ह्मणतोः—

बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें.

### काम करील अशा तऱ्हेची संस्था उभारण्याची आवश्यकता.

उपदेशाप्रमाणें वक्त्यानें स्वतःचें आचरण ठेवलें नाहीं, ह्मणून सत्यसिद्धांताची सत्यता कमी होत नाहीं. सध्या आह्मांस अत्यावश्यक गोष्ट ही आहे कीं, नवीन ज्ञानानें प्राप्त झालेल्या आमच्या नव्या कल्पना व्यवहारांत प्रचलित करण्यासाठीं समाजांतील सर्व वर्गांत शिस्तवार काम करणाऱ्या संस्था उभारल्या पाहिजेत.

## साधू आतां उपयोगीं पडत नाहींत, पण त्यांस पुष्कळ गोष्टी करितां येतील.

युरोप खंडांत मिडल एजेस मध्यें लोकोपयोगी धार्मिक पंथ होते, त्या सारखेच देशोद्धाराचें कृत्य ज्यांच्या हातून बऱ्याच अंशानें साधेल असे आमच्यांत पुष्कळ पंथ आहेत. सर्व देशभर पसरलेल्या साधुसंतांचा मी उल्लेख करीत आहें, हें सांगावयास नको. पण त्यांस या कामीं शिक्षण देऊन कांहीं तरी उपयुक्त गोष्टी ते करितील अशी तजवीज केली पाहिजे. साधुसंतपणा जर भूतदयेशीं सदृश असला, तरच तो साधुपणा खरा. साधूंनीं बांधवजनांस सोडलें तर त्यांचा समाजास काय उपयोग? जो आपल्या देशबांधवांसाठीं आपलें तनमन अर्पितो तो खरा साधु. श्रम आणि जबाबदारी टाळण्यासाठीं जो भिक्षेचें व्रत घेतो, किंवा आपल्या स्वतःच्याच–पामर आत्म्याचें कल्याण करण्याकरितां जो वनवास पत्करतो, तो खचित साधु नव्हे.

## सुधारकांचा सध्यांचा कार्यक्रम.

सध्यां सुधारणेचा कार्यक्रम तर चांगल्या रीतीनें ठरवून देशापुढें मांडिला आहे. या सामाजिक परिषदेनें सुशिक्षित लोकांस सामाजिक सुधारणेविषयीं विचार करण्यास लावून पुष्कळ देशसेवा केली आहे. प्रांजल बुद्धीनें विचार करणाऱ्यांपुढें पुष्कळ गृहस्थांनीं आपल्या भाषणांनीं आणि ग्रंथांनीं नव्या कल्पना व नवे विचार ठेवले आहेत. सामाजिक सुधारणेविषयींचें वाङ्मय सध्यां पुष्कळ विस्तृत झालें आहे. निरनिराळ्या जातींच्या सभा आणि परिषदा भरतात, त्यांचे ठराव नमूद करून ठेवतात, त्यांबरोबरच जर त्या वेळीं होणाऱ्या वादविवादाचा सारांशही नमूद केला, तर बरें असें मला वाटतें. त्यापासून लोकशिक्षणाचे कामीं पुष्कळ मदत होईल. सध्यांच्या मनोवेधक उत्क्रांतीच्या समयींच्या कल्पनांचें व विचारांचें चित्रही यामुळें पुढील पिढ्यांस उपलब्ध होईल.

## व्यवहारोपयोगी काम करणारी संस्था.

अझून देखील या सभापेक्षां अधिक दीर्घ प्रयत्न करणारी, उद्योगी व लोकप्रिय अशा संस्थेची आपणांस जरूरी आहे. आर्यसमाज किंवा खिस्ति मिशनरी मंडळ्यांच्या संस्थेप्रमाणें नेटानें व उत्साहानें प्रयत्न करणाऱ्या संस्था आपणांस हव्या आहेत. हें नवीनच तत्त्व प्रत्येक खेड्यांतील लोकांस मनो-

वेधक तऱ्हेनें समजावून देण्याचा प्रयत्न अशा संस्थेनें करावा; आणि मग अर्थातच सामाजिक सुधारणेच्या प्रश्नास कमी अडचणी येऊं लागल्यामुळें त्यांची प्रगति दिवसेंदिवस होत जाईल अशी आपण खात्री बाळगावी.

## सामाजिक सुधारणेचा सांपत्तिक व राजकीय बाबतींशीं संबंध आहे.

सामाजिक सुधारणेस इतर बाबींपासून भिन्न करितां येत नाहीं. कारण तिचा सांपत्तिक व राजकीय बाबींशीं फार निकट संबंध आहे. एकीची प्रगति झाल्याबरोबर इतरांचीही प्रगति होते. ह्मणून औद्योगिक उन्नतींबद्दल आपल्या अडचणी दूर करून आपली प्रगति करून घेतल्याशिवाय आणि त्याचप्रमाणें शुद्ध तत्वांवर राजकीय बाबींत सुधारणा करून घेतल्याशिवाय, सामाजिक बाबतींतही आमचें पाऊल पुढें जाणार नाहीं.

## औद्योगिक उन्नतीपासून समाजसुधारणेस मिळणारी मदत.

देशाच्या औद्योगिक उन्नतीपासून समाजसुधारणेस पुष्कळ मदत मिळेल अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे. जातिबंधाचें स्तोम औद्योगिक उन्नतीमुळें पुष्कळ कमी झालें, आणि तें अधिक कमी होईल. हिंदुस्थान देश जर अधिक श्रीमंत झाला, तर इतर गोष्टींतील न्यून भरून येण्याविषयींच्या उपायांचा विचार करण्यास अधिक अवधी सांपडेल. देशांतील मानवी शक्तीचा आणि नैसर्गिक स्थितीचा जास्त उपयोग करून घेण्यास आणि लोकशिक्षण वाढविण्यास जास्त भांडवल खर्च करतां येईल. व्यापारधंदा वाढला तर सर्व लोकांत अधिक दळणवळण वाढेल आणि आपल्या सर्वांचें हित एकच आहे, हें तत्व त्यांच्या मनांत उत्तम रीतीनें बिंबेल.

## राजकीय विषय.

राजकीय बाबतींतही आह्मांला पुष्कळ करितां येईल. परकीय सरकार असलें ह्मणजे देशाची राजकीय प्रगति व्हावयाची नाहीं, असा कित्येकांचा समज आहे, तो माझा नाहीं.

कोणतेंही सरकार असेना, त्याला जें कांहीं करतां येईल, तें इतकेंच कीं, आपल्या अमलांतील प्रजेचें उत्तम हित साधावें. जोंपर्यंत तें सरकार आपलें हित आणि प्रजेचें हित एकच समजतें, आणि जोंपर्यंत सुव्यवस्थेनें आणि राष्ट्राच्या प्रगतीविषयींच्या खऱ्या कळकळीनें प्रजाजनाला प्रोत्साहन देतें, तोंपर्यंत तें सरकार राष्ट्रीयच ह्मटलें पाहिजे; परंतु मी ह्मणतों तसा एक

रक घडवून आणिला, तर हिंदुस्थानचें माझ्या मतें मोठें कल्याण होईल. सांगतों त्या मार्गानें राष्ट्रांतील निरनिराळ्या वर्गांतील जीं खरीं जिव्हा- ळीं राजकीय समान हितें आहेत, तीं उजेडांत येऊन केंद्रीभूत होतील. ठा प्रजाजनांचा चांगला पाठिंबा मिळेल, आणि देशाचें सार्वजनिक कल्या- याकरितां असंख्यात वर्ग व पंथ, समाज आणि जाति, यांची एकजूट ाईल. मी सुचवितों तो मार्ग हा कीं, या देशांत एक कायमचें ापावें, आणि त्यावर बादशहाच्या कुळांतील एखादा राजपुत्र कायमचे व्हाइसराय ( प्रतिनिधि ) नेमावें. असा व्हाइसराय असला त्याला हिंदुस्थानाकरितां स्वतःला वाहून घेतां येईल. आपलें व ांचें हिताहित एक आहे, हें त्याच्या चांगलें लक्षांत येईल. असें झालें ह्मणजे मग प्रजाजनांची इतकी भक्ति निदर्शनास येईल कीं, तिची कल्पना आज आपणास मुळींच करितां येत नाहीं. या मार्गानेंच मला वाटतें देशकल्या- णाचे उद्योगाकरितां चाललेल्या सर्व शक्ती, सर्व चळवळी एकवटतील, हें मी कल्पनेनें रचिलेलें सध्याचें चित्र व्यवहारांत आणितां येईल आणि माझी कल्पना केवळ कल्पनाच राहणार नाहीं अशी माझी उमेद आहे. ग हें ध्यांचें चित्र व्यवहारांत वठेपर्यंत आपण सर्वांनीं

## मातृभावाची आणि संहतीची वृत्ति

ागत करण्याकरितां हरतऱ्हेचे प्रयत्न केले पाहिजेत. आपण मोठ्या नानें ह्मणतों कीं आमच्या वेदांतांत सांगितलें आहे 'सर्व भूतस्थ- र्वभूतानि चात्मनि' ह्मणजे सर्व भूतांच्या ठिकाणीं आत्म्याला णि सर्व भूतें आत्म्यांत पहावीं—पण या मोठ्या तत्त्वास आपल्या आणण्याचें आपण कां बरें विसरतों? दुसरें वाक्य असें आहे कीं,

**यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति**
**सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ।**

आपल्या धर्माच्या अत्युच्च तत्त्वास अनुसरूनच का आपण इतर या किंवा आपण हलक्या ह्मणून मानिलेल्या जातींच्या लोकांचा आपण तिरस्कार करितों व त्यांच्या संपर्कापासून दूर रहातों? आपल्या ामाजिक आणि राष्ट्रीय वृत्तीमध्यें परस्परांविषयीं अविश्वास, असूया व ुही माजवितों. सर्वत्र सर्व भूतांचे ठायीं एक आत्मा आहे, अशी पुली खरोखर भावना असती, तर त्या आत्म्याच्या विभूतींचा

आपण छल न करितां, आपल्या बंधूचा धिक्कार करण्यांत आ। द्वेष करण्यांत आपण त्या परमात्म्याचाच धिक्कार आणि द्वेष कर या गोष्टीचा आपल्या मनावर लख्ख उजेड पडता; ह्मणून पुन्हा मी आपणां सर्वांस सांगतों कीं, आपल्या पूर्वींच्या कल्पनेच्या उदात्त चा अवलंब करूं या, तीं साध्यें चांगलीं समजून घेऊं या, आणि व नात्यानें आणि राष्ट्राच्या नात्यानें अमलांत आणण्याचा प्रयत्न क आह्मांहून जे निराळे आहेत त्यांचे गुण चांगले ओळखूं या. जातीनें णांहून जे भिन्न आहेत, त्यामध्यें कोणते वर्णनीय गुण आहेत ते शोधू त्यांच्यांत जे दोष आहेत, ते दृष्टीपलीकडे सारूं या; हें हिंदुस्थानच्या स्थितीचें काल्पनिक चित्र आपल्या डोळ्यांपुढें अक्षयी ठेवून सर्वजण या. आपला भाविष्यकाळ मोठा आणि एकीचा होईल अशा दृष्टीनें जे आपले बंधुवर्ग प्रयत्न करून कांहीं यश मिळवितात, त्या यशावरूनच त्यांच्या योग्यतेची कल्पना करूं या.

## खऱ्या देशाभिमानाचें चित्र.

ज्या कोणी मग ते ख्रिस्ती, हिंदू, मुसलमान अथवा पारशी यांनीं राज्यव्यवहारांत लोकोपकाराच्या कामांत, शास्त्रांत, पराक्रमांत किंवा विद्येंत एकभक्तीनें व निरहंकारानें हिंदुस्थानचे कल्याणार्थ जें काम केलें असेल तें नावाजूं या व हें काम खऱ्या देशभक्ताचें खरें लक्षण आहे असें समजूं या. जो आपल्या देशावर इतकें प्रेम ठेवतो कीं, त्याकरितां आ देहही ठेविण्यास तो राजी होतो, तो खरा देशभक्त. जो जाती स रागत आलेल्या थोरवीची नसती महती मनांत आणून, मीरांहू मोठा आहें, अशी केवळ वलगना करितो तो खरा देशभक्त ... स्फूर्ति एकच आहे. सर्व साध्यांच्या चित्रांमागें एकच ...त्व आहे स्फूर्तीनें हीं साध्यें प्राप्त करून घेण्याकरितां, ते कोणत्याही जातीचे, व व पंथाचे असोत आपल्या हातून होईल तें उत्तम उत्तम कार्य करीत आहे आपणांला हिंदुस्थानचें कल्याण करण्याकरितां काम करावयाचें असे आणि पुढेंमागें सुधारणा खरोखरच घडवून आणण्याची इच्छा धरावयाची असेल, तर हीच स्फूर्ति आपल्या सर्वांच्या मनांत अक्षयी जागृत राहिली पाहिजे.

N. M. P. & Co.

REFBK-0000251